MISC-26-27

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

(नॅकद्वारे A+ दर्जा)

**विद्यार्थी विकास**


संचालक (का.) : २४०३११३२
विद्यार्थी विकास : २४०३११३३
फॅक्स : (०२४०) २४०३११३४, २४०३११५०
तार : बामुसिटी
Web Site : www.bamu.ac.in
E-Mail : dsw@bamu.ac.in

डॉ. कैलास अंभुरे
संचालक,
विद्यार्थी विकास मंडळ
विद्यापीठ परिसर,
छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४ (महाराष्ट्र)
मो. क्र. : ७५८८१६५२२१


संदर्भ /संविवि/२०२६/3744-3789 दिनांक : १७.०८.२०२६

प्रति,
**मा. विभागप्रमुख**
सर्व शैक्षणिक विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ,
**छत्रपती संभाजीनगर.**

**विषय : राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'यशोदा (AI) – कृत्रिम बुद्धिमत्ता आणि महिला' या विषयावरील क्षमता बांधणी कार्यक्रमास विद्यार्थीनींची, महिला यांची उपस्थिती सुनिश्चित करण्याबाबत.**

**महोदय /महोदया,**

उपरोक्त विषयी आपणास कळाविण्यात येते की, विद्यापीठातील सर्व विभागप्रमुख, संचालक, यांना कळविण्यात येते की, राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी दु. १.०० ते सायं. ६.०० वाजेपर्यंत 'यशोदा (AI) – कृत्रिम बुद्धिमत्ता आणि महिला' या विषयावर एक दिवसीय क्षमता बांधणी कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. सदर कार्यक्रमामध्ये मा. श्रीमती विजया रहाटकर, अध्यक्ष, राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली या स्वतः उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहे.

तरी विद्यापीठातील सर्व विभागप्रमुख / संचालकांनी आपल्या विभागातील विद्यार्थीनींना महिला शिक्षिका व प्राध्यापिका सदर कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी आवश्यक सूचना द्याव्यात व जास्तीत जास्त सहभाग सुनिश्चित करावा. सदर कार्यक्रम हा महिलांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बदलत्या तंत्रज्ञानाशी परिचित करून देण्यासाठी तसेच त्यांच्या डिजिटल सक्षमीकरणासाठी अत्यंत उपयुक्त असल्याने सर्व संबंधितांनी याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

धन्यवाद,

**संचालक**
विद्यार्थी विकास

|| स्त्रीशक्तिरतुल्या सदा ||

महाराष्ट्र शासन

GOVERNMENT OF MAHARASHTRA

महाराष्ट्र राज्य महिला आयोग

**Maharashtra State Commission for Women**

गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डिंग)
पोटमाळा, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
Tel. : 022-2659 0474 / 2659 2707
Website : www.mscw.org.in

Gruha Nirman Bhavan (MHADA Bldg.)
Mezzanine Floor, Kalanagar, Bandra (E.), Mumbai 400 051.
Toll Free No. 155209
E-mail : mscwmahilaayog@gmail.com

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ विद्यार्थी विकास छत्रपती संभाजीनगर
466 INWARD No. 14-8-26

जावक क्रमांक : ममआ-२०२६/यशोदा एआय/का-३/741

दिनांक : १२/०८/२०२६

Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University Chhatrapati Sambhajinagar
In.No. 237134 (Gen.Admin.) Date 14/8/26

प्रति,

मा.कुलसचिव

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,

जिल्हा - छत्रपती संभाजीनगर

विषय : राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजीनगर येथे दि.२२ ऑगस्ट २०२६ **रोजी यशोदा (AI)-कृत्रिम बुध्दिमता आणि महिला** या विषयावर आयोजित क्षमता बांधणी कार्यक्रमाबाबत.

मा.महोदय,

राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने **'यशोदा (AI)-कृत्रिम बुध्दिमता आणि महिला'** या विषयावर, तापडीया नाटय मंदिर, छत्रपती संभाजीनगर येथे दि.२२ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी १ ते ६ या वेळेत एक दिवसीय क्षमता बांधणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमामध्ये **मा. श्रीमती विजया रहाटकर, अध्यक्ष, राष्ट्रीय महिला आयोग, नवी दिल्ली** या स्वत: उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

यशोदा एआय या उपक्रमाचा मुख्य उद्देश महिलांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence - AI) द्वारे निर्माण होणाऱ्या संधींबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि त्याचबरोबर वाढत्या डिजिटल धोक्यांपासून सुरक्षित राहण्यासाठी त्यांना ज्ञान आणि साधनांनी सक्षम करणे हा आहे .सहभागींना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) मूलभूत गोष्टी ,दैनंदिन जीवन/ रोजगार आणि उद्योजकतेमध्ये एआयच्या व्यावहारिक वापर आणि डिजिटल सुरक्षितता, सायबर धोके आणि एआयच्या नैतिक वापराविषयी (ethical use) जागरूकता निर्माण करणे ही कार्यक्रमाची प्रमुख उद्दिष्टे आहेत .दैनंदिन जीवनातील एआय समजून घेणे (Understanding AI in Daily Life) व एआय मधील संधी आणि उपयोग (Opportunities & Use of AI) याबाबत तज्ञांमार्फत मार्गदर्शन करण्यात येणार आहे .

तरी सदर कार्यक्रमासाठी आपण विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहावे. तसेच आपल्या विद्यापीठातील विद्यार्थीनी, महिला शिक्षिका, प्राध्यापिका यांना उपस्थित राहण्याबाबत संबंधितांना आपल्या स्तरावर सूचित करण्यात यावे, ही विनंती.

आपली,

नंदिनी आवडे (भा.प्र.से)

सदस्य सचिव

DSD / DR. PG / DR. Estt.

14 AUG 2026

1058977

1058976.

1058975